Vol 6 Issue 3 September 2016

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

Regional Editor

Dr. T. Manichander

International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org

ISSN: 2231-5063 Impact Factor :4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 3 | September - 2016

GRT Golden Research Thoughts

गानतपस्विनी मोगूबाई कुर्डीकर आणि गानहिरा हिराबाई बडोदेकर यांची गानशैली

सौ. निलम मुकुंद बोकील , डॉ. स्नेहाशिश दास

सारांश

गानतपस्विनी मोगूबाई कुर्डीकराचा जन्म 15 जुलै 1904 मध्ये झाला. तर गानहिरा हिराबाई बडोदेकरांचा जन्म 29 मे 1905 मध्ये झाला. दोघींच्या वयामध्ये केवळ दहा महिन्यांचे अंतर असल्याने दोघींचा जीवन प्रवास एकाच काळामधील होता.

पुर्वीच्या काळात स्त्रियांना मोकळेपणाने बोलण्याचीच मुभा नव्हती, तर स्त्रियांनी गाणे म्हणणे ही गोष्ट फार दूरची होती. स्त्रियांचे गाणे तेव्हा केवळ माजघरापुरते मर्यादित होते. अंगाईगीत, डोहाळे म्हणण्यापलिकडे स्त्रियांचा संगीताशी संबंध नव्हता. आजच्या काळासारखे स्त्री स्वातंत्र्य त्याकाळी नव्हते, स्वतंत्र विचाराने, स्वतंत्र प्रवृत्तीने वागण्याची मुभा स्त्रियांना नव्हती. त्या काळातील स्त्रियांच्या परिस्थितीची कल्पना आजच्या चालू काळातील पिढीला करता येणार नाही. लोकांसमोर बसून गाणे म्हणणे हा स्त्रित्वास कलंक होता. स्त्रीने नवऱ्याच्या आश्रयावर राहून आपले जीवन कंठावयास हवे. तंबोरा हा नवऱ्याला पर्याय नाही. तसेच पुरूषांनी देखील स्त्रियांच्या गाण्याला उत्तेजन देणे म्हणजे कामूकतेस उत्तेजन देणे अशा कुत्सित विचारात वावरणारा तो काळ होता. इतक्या अवघड परिस्थितीत देखील बायकांनी गाण्याची मैफील केलीच तर त्या मैफिलिला पुरूषांनी जाणे म्हणजे त्याकाळी ' अब्रहमव्यम्' होते. कारण गाणे–बजावणे म्हणजे चैन करणे, मजा करणे असे समजले जात होते. संगीत ही 'पवित्र' कला आहे, हेच त्या काळातील लोक विसरले होते. अशा संगीत कलेच्या कठीण काळात मोगूबाई कुर्डीकर आणि हिराबाई बडोदेकर वाढल्या. त्यांनी संगीत कला आत्मसात केली, वाढविली आणि तिचा प्रसार करण्याचे महान कार्य देखील केले आणि भारतीय संगीतावरील लांच्छन पुसून टाकले.

दोघींनी संगीत विद्या गुरूच्या करड्या शिस्तीमधून गुरूकूल पध्दतीने घेतली होती. मोगूबाईनी जयपूर घराण्याची तर हिराबाईंनी किराणा घराण्याची कसून तालीम घेतली. दोघींनी त्या त्या घराण्याची वैशिष्टये आत्मसात करून त्यात स्वतःच्या कल्पकतेची, बुध्दिचातुर्याची, विचारांची भर घालून स्वतःची एक वेगळी गानशैली निर्माण करून स्वतःचा वेगळा ठसा समाजासमोर उमटवला आणि लोकप्रियता संपादन केली.

मोगूबाईनी स्वर–लयीचा समन्वय साधण्याचे घराण्याचे वैशिष्टये जोपासून, स्वतःच्या सौंदर्यतेतून अनोख्या ढंगाने स्वतःची गायकी आकर्षक बनविली. त्यांनी कठीण गुणांना आत्मसात करुन स्वतःची बुध्दिप्रधान शैली निर्माण केली. हिराबाईंनी स्वरप्रधानता हे घराण्याचे खास वैशिष्टय आपल्या गायकीत जोपासले. गुरूमुखातून मिळालेल्या तालमीत त्यांनी स्वतःच्या स्वरविलासातून, कल्पनाशक्तीतून भर घालून स्वतःची एक खास प्रतिभासंपन्न, सहजसोपी गानशैली तयार केली. दोघींनी आपापल्या गुरूंची गानशैली जोपासून स्वतःमधील अंगभूत गुणांनी ती अलंकृत केली आणि स्वतःची खास शैली निर्माण केली. गुरूंनी दिलेल्या विद्येची पोपटपंची न करता त्यात स्वतःच्या अभ्यासाची सखोल भर घातली पाहिजे हे ह्या दोन योगिनींच्या गानशैलीचा अभ्यास करतांना लक्षात येते.

प्रस्तावना

पूर्वीच्या काळात संगीत जलशात श्रोत्यांची संख्या माफक होती. त्यामुळे त्यात कलाकाराच्या सांगीतिक विद्वतेचा कस आपोआप लावला जात असे. कलाकाराची स्वर लगावाची पध्दत, आलापी, बोलबाट, ताना इत्यादी मधून कलाकाराच्या शैलीचा अभ्यास रसिक श्रोते करत असत. इतके त्या काळातील श्रोते अभ्यासू होते.

अभिजात गायकीच्या जवळजवळ दोनशे वर्षापूर्वीच्या जमान्यात असा अलिखित कायदा होता की, धृपदियांनी धृपदच गायचे, ख्यालीयांनी ख्यालाचाच उत्कर्ष करायचा, ठुमरीवाल्यांनी ठुमरीमध्येच प्राविण्य मिळवायचे, म्हणजे प्रत्येकाने आपआपल्या संगीत प्रकारात रत व्हायचे आणि आपल्या शैलीचा उत्कर्ष साधायचा उदाहरणार्थ डागरबंधू धृपद–धमार गात असत, मोगूबाई ख्याल गायिकाच होत्या, जयमाला शिलेदार नाट्यपद गाण्यात निपूण होत्या. तर ज्योत्सना भोळे भावगीत गायिका म्हणून आज देखील अविस्मरणीय आहेत. अशाप्रकारे कलाकार ज्या गीतप्रकारात प्रविण असेल तोच प्रकार तो आपल्या मैफिलीत सादर करत असे.

स्वातंत्र्योत्तर काळात श्रोत्यांच्या संख्येत अफाट वाढ झाली. असंख्य श्रोत्यांच्या मनोरंजनाची जबाबदारी कलाकारांवर आली. कलाकारांच्या मानसिकतेत देखील खूपच बदल झाला. पर्यायाने कलाकारांना आपल्या मैफिलींच्या सादरीकरणात बदल करणे भाग पडले. कलाकार सुरूवातीला एखादा ख्याल, त्यानंतर ठुमरी नंतर एखादे नाट्यगीत, मध्यंतरानंतर पुन्हा एखादा ख्याल, एखादी ठुमरी, नाट्यगीत अथवा भजन आणि शेवटी भैरवी सादर करत असे. असा मैफिलीचा साचा ठरलेला असे. मोगूबाईंनी चालू काळाशी कधीच सोयरीक केली नाही. त्यांनी आपले स्वयंवर ख्यालाशी केले आणि ख्याल गायनशैलीवरच प्रभुत्व मिळविले. त्यांनी गुरू

अल्लादियाखॉ आणि हैदरखॉच्या गायकीचा सुरेख संगम साधून स्वतःची वेगळी शैली निर्माण केली. जयपूर घराण्याच्या संस्कारीत गायकीवर स्वतःमधील बुध्दिप्राविण्याची आणि तपश्चर्येची भर घालून स्वतःची स्वंतत्र आदर्शवादी शैली निर्माण केली आणि संगीत क्षेत्रात त्या गायकीला विश्वमान्य केले.

हिराबाईंनी मात्र चालु काळाशी समन्वय साधला. ख्याल गायनाबरोबर ठुमरी, नाट्यगीते, भावगीते, भजन इत्यादी प्रकार त्या आपल्या मैफिलीत गात असल्यामुळे त्यांचे गाणे जनसामांन्यापर्यंत पोहोचले. हिराबाईंनी गुरू वहिद खॉ कडून शास्त्रीय संगीताची, बालगंधर्व, सवाईगंधर्व आणि गोविंदरव टेब्यांकडून नाट्यसंगीत आणि गिरीजादेवींकडून ठुमरी गीत प्रकारची तालीम घेतली. त्या प्रत्येक शैलीला स्वतःच्या प्रतिभेतून पैलू पाडून स्वतःची शैली निर्माण केली. आपल्या मैफिलीचा स्वतंत्र साचा तयार करून, देशभरातील रसिक श्रोत्यांचा मनावर स्वतःच्या शैलीची पकड बसविली.

या दोघींनी दिलेल्या गानशैलीच्या योगदानाचा उपयोग आजच्या तरूण पिढीला नक्की होईल असे मनापासून वाटते.

घराण्याची निवड

मोगूबाईंचा जन्म छोट्याशा कुर्डी गावी झाला. त्या गावात संगीत शिक्षणाची कोणतीच सोय नव्हती म्हणून त्यांना त्यांचे गाव सोडावे लागले. त्यांच्या संगीताची सुरूवात आंबवली गावातील हरीदासाच्या भजनापासून झाली. त्यानंतर सातारकर नाटक कपंनीतील चिंतोबा गुरवांकडून त्यांनी नाट्यसंगीताची तालीम घेतली तर दत्तारामजी नांदोकरांकडून त्यांनी ठुमरी, दादरा, कजरी, टप्पा, होरी हे गीत प्रकार आत्मसात केले. पण हे गीत प्रकार त्यांना फुलासारखे नाजूक वाटले. त्यांच्या मनातील संगीत त्यांना मिळत नसल्याने त्या आजारी पडल्या. हवापालट करण्यासाठी त्या दक्षिण महाराष्ट्रातील संगीताचा वारसा लाभलेल्या मिरज गावी आल्या. तेथे मोगूबाईंनी एक वर्षे इनायत खॉ पठाणाकडून शास्त्रीय संगीताची तालीम घेतली. गुरूने शिकविलेल्या यमन, भूप, दुर्गा, हमीर, भैरवी रागांची त्यांनी कसून मेहनत केली. एक एक सूर त्यांनी कंठगत केला. एकदा त्यांचे हे सच्चे सूर खॉ साहेब अल्लादियाखॉ यांच्या कानावर पडले आणि खॉ साहेबांनी आपण होउन मोगूबाईंना शिष्य म्हणून स्विकारले व तालीम देण्यास सुरूवात केली. निरागस मोगूबाईंना हे माहित नव्हते की ते जयपूर घराण्याचे युवकप्रवर्तक संगीतसूर्य अल्लादियाखॉ आहेत. मोगूबाईंना ती गोष्ट नंतर समजली अशाप्रकारे घरामधून संगीताचा कोणताही वारसा न मिळालेल्या मोगूबाईंचे जयपूर घराण्याचे रीतसर शिक्षण सुरू झाले. परंतु अल्लादियाखॉच्या तालमीत सतत खंड पडू लागल्यामुळे मधला काही काळ मोगूबाईंनी आग्रा घराण्याचे बशीन हुसेन खॉ आणि विलायत हुसेन खॉ यांच्याकडे आग्रा घराण्याची तालीम घेतली. पण मुळात अल्लादिया खॉनी गळयावर चढवलेली जयपूर गायकी पुसून आग्रा घराण्याची गायकी गळयावर चढवणे त्यांना अवघड जाऊ लागले म्हणून मोगूबाईनी पुढे अल्लादियाखॉ यांचे बंधू हैदर खॉ यांच्याकडून सहा वर्ष जयपूर घराण्याची तालीम घेतली आणि खंडाखंडाने एकूण सव्वीस वर्ष मोगूबाईंनी अल्लादियाखॉ यांच्याकडून जयपूर घराण्याची रीतसर तालीम घेतली.

हिराबाईंचा जन्मच किराणा घराण्यात झाला. किराणा घराण्याचे प्रभावी गायक अब्दुल करीम खॉ हिराबाईचे वडिल होते. त्यामुळे किराणा घराण्याचे रक्त हिराबाईच्या नसा नसांमध्ये खेळत होते. मुलींनी गाणे शिकणे हे कुलिन स्त्रियांचे लक्षण नाही असे मानणाऱ्या अब्दुल करीम खॉनी प्रत्यक्ष हिराबाईंना जरी फारसे संगीताचे शिक्षण दिले नसले तरी घरात चालणाऱ्या स्वर यज्ञाचे सूर हिराबाईंच्या कानावर पडत होते. आजी हिराबाई आणि आई ताराबाईकडून देखील हिराबाईंना संगीताचा वारसा मिळाल्यामुळे स्वराचे ज्ञान त्यांना जन्मजात होते. अब्दुल करीम खॉची गायकी हिराबाईंच्या गळयावर त्यांचे थोरले बंधू सुरेशबाबू माने यांनी चढविली असली तरी हिराबाईंचे घरंदाज गायकीचे खरे शिक्षण अब्दुल वहिद खॉ यांच्याकडे झाले. अब्दुल वहिद खॉ घरंदाज संस्कारात वाढले असल्याने त्यांचे सर्व गुण त्यांनी हिराबाईंच्या गळयावर उतरवले आणि हिराबाईंना शास्त्रीय संगीतात तयार केले. हिराबाईनी वहिदखॉकडून सलग चार वर्षे किराणा घराण्याची तालीम घेतली.

यावरून असे दिसून येते मोगूबाईकडे जयपूर घराणे आपणहून चालत आले आणि हिराबाईचा जन्मच किराणा घराण्यात झाला त्यामुळे ठरवून दोघींनीही घराण्याची निवड केली नाही तर ती आपोआप झाली.

घराणेदार गायकीचा अभ्यास

अल्लादियाखॉची गायकी अतिशय अवघड होती. ते आपल्या शिष्यांच्या कंठात मंत्रसार्मथ्यासारखे गानसामर्थ्य रूजवत असत. त्यांची गायकी योध्दयासारखी धारधार व धीरगंभीर होती असे गुरू मोगूबाईना लाभले आणि मोगूबाईंनी त्यांच्या गायकीचे मर्म पेलून परिपूर्णतेला जाण्याचा ध्यास घेतला.

अल्लादियाखॉनी मोगूबाईं मधील ईश्वरदत्त स्वर ओळखला होता. आपल्या घराण्याचा वारसा मोगूबाई पुढे चालू ठेवतील असा त्यांच्याबद्दलचा विश्वास अल्लादियाखॉच्या मनात निर्माण झाला आणि त्यांनी मोगूबाईंना स्वर लगावापासून तान क्रियेपर्यंत सर्व शिक्षण दिले. आवाज आकारात स्वच्छ, मोकळा लावण्याचे शिकवले, खॉसाहेबांनी स्वतः मोगूबाईकडून फिरके, पलटे घोटून घेऊन भरपूर दमसास निर्माण करुन घेतला. चमत्कृतीपूर्ण आलापी, ताना मोगूबाईकडून कंठगत करून घेतल्या. रागाची शुध्दता राखण्याचे बंधन कटाक्षाने घातले. अवघड–पेचदार ताना, बोल–उपजअंग, अचानक सम घेण्याची किमया खॉसाहेबांनी मोगूबाईच्या कंठात रूजवली. अवघ्या बावीस दिवसात खॉसाहेबांनी मोगूबाईच्या गळ्यात मुलतानी राग बसवला होता. दिड वर्षात खॉ साहेबांनी तोडी, धनश्री, पूर्वी हे राग शिकवले होते. त्यानंतर बसंत–बहार, रायसाःकानडा, सुहा–कानडा, संपूर्ण–मालकंस बसंती–केदार, शुध्दनट, सावनी कल्याण, सावनीनट, ललीतागौरी, बीहागडा असे अनेक अनवट अवघड राग शिकवले. खॉसाहेबांनी मोगूबाईनी विशिष्ट पध्दतीने स्वरलगावाची दिशा देऊन त्यांचे गाणे प्रकाशाकडे नेले.

अल्लादियॉच्या तालमीत सतत खंड पडल्यामुळे मोगूबाईनी बशीर हुसेन खॉकडे आग्रा घराण्याची तालीम घेण्यास सुरूवात केली. घराण्यातील बदल मोगूबाईंच्या पचनी पडेना, मोगूबाई आवाज खरडून, जोरकसपणे लावू लागल्या. त्यामुळे त्यांचे गाणे इकडे–तिकडे होऊ लागले म्हणून बशीर खॉनी मोगूबाईना आग्रा घराण्याचे प्रवर्तक विलायत हुसेन खॉ यांचा गंडा बांधण्याची विनंती केली. मोगूबाई विलायत खॉ यांच्या गंडाबंध शागीर्द झाल्या पण विलायतखॉच्या प्रकृती अस्वास्थाने मोगूबाईचे त्या घराण्याचे गाणे तिथेच थांबले.

अल्लादियाखॉनी मोगूबाईना त्यांचे बंधू हैदर खॉ यांच्याकडे जयपूर घराण्याची तालीम घेण्यासाठी पाठवले. अल्लादिया खॉ आणि हैदरखॉ यांचे एकच जयपूर घराणे असून देखील दोघांच्या शैलीतील व्यक्तीगत सौंदर्य वेगळे होते. हैदरखॉचे बोल फिरविण्याचे कसब वैशिष्ठयपूर्ण होते. तर अचूक समेवर येण्याचे कसब अल्लादियाखॉमध्ये होते. हैदरखॉनी मोगूबाईंचा गळा परत जयपूर गायकीस अनुकूल करून घेण्यासाठी नऊ महिने त्यांच्याकडून बिहाग रागाची अस्थाई घोटून घेतली होती. चीजेतील शब्दाची मोडतोड न करता त्यातील अर्थ कायम ठेवायचा आणि त्याचवेळी स्वरकाम करावयाचे. त्यांची बोलबाट करण्याची वैशिष्ठयपूर्ण कला त्यांनी मोगूबाईना मनपासून शिकवली. तीन, चार, नऊ, अकरा, मात्रांवर बोल

बांधून समेवर येणे ही हैदरखॉंची खासियत त्यांनी मोगूबाईंच्या कंठावर चढविली. शब्द संगीताशी एकरूप करण्यासाठी त्यांना इकारात उकारात लावण्याचे, आरोही अवरोही वळण कसे घ्यायचे याचे सुक्ष्म शिक्षण हैदर खॉंनी मोगूबाईना सहा वर्षे चांगलेच दिले. त्यामुळेच दोघांच्या गायकीचे मनोहरी रूप मोगूबाईचा गाण्यात दिसून येते आणि हेच घराणेदार गायकीचे खरे फलीत आहे असे मला वाटते.

हिराबाईंचे शास्त्रीय संगीतातील पहिले गुरू त्यांचे मोठे भाऊ सुरेश बाबू. त्यांनी हिराबाईंना यमन रागाची रितसर तालीम दिली पण भावा–बहिणीच्या नात्यामुळे शिक्षणात गांभीर्य रहात नसे म्हणून हिराबाईंचे संगीत शिक्षण किराणा घराण्याचे नामवंत गायक अब्दुल वहिद खॉं यांच्याकडे सुरू झाले. वहिखॉंनी हिराबाईना वाद्यवादनातील तत अंगाची गायकी शिकविली. वहिदखॉं हिराबाईच्या घरी राहून त्यांना रितसर तालीम देऊ लागले. हिराबाईचा यमन राग झालेला असल्याने वहिदखॉंनी हिराबाईना सुरूवातीला पटदीप राग शिकवला.

वहिदखॉंच्या शिकवणीमध्ये मेहनतीवर अधीक भर होता. चीजेचा एक एक अंतरा लयीत येण्यासाठी ते पंधरा–वीस दिवस तो घोटून घेत असतं. मोठया ख्यालाचा अस्थाई–अंतरा बंदिस्तपणे येण्यासाठी ती बंदिश ते चाळीस चाळीस दिवस शिकवत असत. नंतर दोन तीन महिने तीच बंदिश पुन्हा पुन्हा घोटून घेत. एवढी पूर्व तयारी करून घेतल्यावर रागाची समज तयार झाली असे ते म्हणत असत. त्यानंतर मंद्र, मध्य व तार सप्तकातील विस्तार क्रमाने शिकवत. प्रत्येक सप्तकातील सहा सात प्रकार तरी कंठगत झाले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. एक एक पल्टा ते तासन तास शिकवत असल्याने हिराबाईंना शिकतांना चिकाटी ठेवावी लागत असे. कंटाळा शब्द वहिद खॉंच्या शब्दाकोशातच नव्हता, कारण कंटाळा आला म्हणजे त्या रागावरचे प्रेम संपले, तो राग म्हणता येणार नाही असे वहिदखॉंचे म्हणणे असे.

त्याकाळात गुरू जसे शिकवतील तसेच गळ्यातून उतरावयाचे. गुरूला उलट प्रश्न करायचा नाही . गुरूवर संपूर्ण श्रध्दा, निष्ठा ठेवून स्वतःला झोकून देऊन कला आत्मसात करायची असा दंडक घराणेदार शिक्षण पध्दतीचा असे आणि तेच बाळकडू गुरू आपल्या शिष्याला देत असत. वहिदखॉंनी हिराबाईंना स्वच्छ, खुला आवाज लावावयास, अचूक स्वरस्थाने श्रुतीज्ञान, स्वरफेक, स्वरलगाव आणि हमखास आवाज स्वरापर्यंत पोहोचवण्याची किमया साधण्याच्या दृष्टीने तालीम दिली. वहिद खॉंनी हिराबाईच्या कंठावर बोल आलाप, ताल व लयींच्या समन्वयातून शब्दफेक आणि स्वरप्रधान आलापचारी चढविली होती. बंदिशीचा अस्थाई अंतरा पूर्णपणे रेखीव व लयबध्द मांडून नंतर संथपणे, शांतपणे, आलापचारी करावयास शिकवली होती. मींड गमकाचे खास ज्ञान त्यांनी हिराबाईंना दिले. वहिदखॉंनी हिराबाईना बागेश्री, दुर्गा, सारंग, भिमपलास, तोडी असे अनेक प्रचलीत राग शिकविले.

वहिदखॉंची शिकवण्याची पध्दत घरंदाज असली तरी ती अतिशय किचकट व कडक शिस्तीची होती. त्यामुळे हिराबाईंनी संपूर्ण चिकाटी पणाला लावून विद्यार्जन केले. वहिद खॉंनी हिराबाईच्या षड्ज भरण्यावर विशेष लक्ष केंद्रित केल्याने हिराबाईचा षड्ज लागणे म्हणजे 'मर्मबंधातली' ठेव होती. एकदा वहिदखॉंना हवा तसा तोडी रागाचा गांधार हिराबाईंच्या गळयातून न निघाल्यामुळे त्यांनी हिराबाईंच्या गालावर थप्पड मारायला देखील कमी केले नव्हते. खॉं साहेब प्रचंड, रागीट, तापट होते, त्यांच्या मनाप्रमाणे आलाप, ताना येत नाही तोपर्यंत ते हिराबाईंना जेवणखाण देत नसत. प्रत्येक यशस्वी कलाकराच्या मागे त्याच्या गुरूने शिष्याकडून करून घेतलेली तालीम आणि शिष्यावर टाकलेला विश्वास असे. हिराबाई आणि वहिद खॉं मध्ये तसेच होते. हिराबाई जरी वहिदखॉंच गंडाबंध शीर्गाद होत्या तरी गुरूने दाखवलेल्या मार्गात त्यांनी स्वतःच्या प्रतिभेची देखील भर घातली होती. त्यामुळे त्यांची स्वतःची स्वतंत्रशैली निर्माण झाली.

यावरून असे दिसून येते अल्लादिया खॉं आणि वहिद खॉं या दोघांची शिक्षण पध्दती उस्तादी थाटाची होती. त्यांनी शिष्यांना संगीत शिक्षणाबरोबर चौफेर विचार करण्याची दृष्टी दिल्यामुळे दोघीजणी आपापली स्वतंत्र शैली निर्माण करू शकल्या असाव्यात असे मला वाटते.

संगीत साधना

पूर्वीचे कसलेले कलावंत अठरा तास संगीताचा रियाज करत असत तो आदर्श मोगूब आपल्या नजरेसमोर ठेवला होता. त्या पहाटे उठून तंबोरा लावून त्या तंबोऱ्याच्या सुरात स्वर सप्तकातील बारा स्वरांचा मोकळ्या आकारयुक्त आवाजात रियाज करत असत. स्वर सप्तकातील प्रत्येक स्वर त्या एकाग्र चित्ताने गळयामध्ये उतरवत असत. मोगूबाईनी संगीताच्या रियाजासाठी अपार कष्ट केले. फिके तयार करणे, स्वरांवर हलकेच आघात करून, स्वरांना ताकद लाऊन स्वर गळयातून काढणे, पांढरी सहाच्या सुरामध्ये मंद्र पंचम ते तार पंचमा पर्यंत सहज लिलया फिरणे, एक एक पलटा, अलंकार अगणितवेळा घोटणे असा त्यांचा अखंड रियाज चालत असे. रियाजातून त्यांनी प्रचंड दमसाराची ताकद स्वतःमध्ये निर्माण केली. गमकाच्या मिंडेच्या ताना त्यांनी कंठगत केल्या. संगीताकडे मोगूबाईंनी एक कला म्हणून न पहाता अध्यात्म म्हणून पाहिले. संगीताची डोळसपणे तपश्चर्या केली आणि स्वरांचा समृध्द संसार स्वतःच्या गळयामध्ये थाटला, षड्ज, रिषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत व निषाद हया सात स्वरांची स्थित्यंतरे जाणून घेवून तीव्र, तीव्रतर व तीव्रतम तसेच कोमल, कोमलतर, कोमलतम अशा संज्ञांचा अभ्यास केला. प्रत्येक स्वरामधील भाव, रसाविष्कार, वेगळा असून त्यातून रागाची निर्मिती होते, याचा सखोल अभ्यास मोगूबाईंनी केला. गमक, कठीण, अतीकठीण तानक्रिया गळयातून काढण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. अकार, आकार, इकार ,उकाराचा फरक जाणून डोळसपणे रियाज केला. मोत्यासारखी तान बाहेर पडण्यासाठी सुरूवातीचा शब्द आ न म्हणता हा म्हणून त्या हा ला जोर दिल्यास तानेतून सुरांचे मोती बाहेर पडतात हे स्वतः प्रयोगाने सिध्द करून दाखवले.

तालाचा खास अभ्यास प्रसिध्द तबला, वादक खाप्रुमामा पर्वतकरांबरोबर केला. पाच सात, आठ, नउ,बारा सोळा, वीस अशा विविध मात्रांच्या चक्रधारात त्यांनी ताना बसवलया. आड, कुआड, लय त्यांनी अभ्यासाने आपल्या गायकीत आणली. स्वरमात्राची मती गुंग करणारी लय मोगुबाईनी आपल्या गायकीत मिळवली. त्या स्वतः डग्यावर सर्व ताल वाजवण्यास शिकल्या. विलंबित त्रिताल, आडाचौताल, झुमरा, तीलवाडा, झपताल, रूपक, इतकेच नाही तर साडे अकरा मात्रेच्या तालात देखील मोगूबाई सहज गात असत. बंदिशीची अस्थाई त्या शंभरवेळा घोटत. बंदिशीच्या शब्दांचे उच्चार, त्यातील लयीचा झोत जाणून घेण्यासाठी त्या कुठलाही कंटाळा करत नसत.

रियाजमधील चूक सांगण्यासाठी मोगूबाईनी घरामध्ये कोणीच नव्हते. एखादी तान किंवा पलटा गळयामधून बरोबर निघत नसेल तर त्या स्वतःच्या मांडीला चिमटे घेत असत नाहीतर मांडीवर निर्दयपण चापट्या मारत असत. मोगूबाईनी भौतिक जीवनाचा त्याग करून आपले जीवन संगीताकडे समर्पित केले.

हिराबाई संगीताकडे जन्मोजन्मीची साधना म्हणून बघत असत. त्या रियाजाला बसत ते भक्ताच्या श्रध्देने आणि स्वर लावत ते योग्याच्या अंतर्मुखतेने, त्यामुळे स्वर हा त्यांचा परमात्मा होता. त्याच्या माध्यमातून त्या नादब्रम्हापर्यंत पोहचत असत. संगीत साधना ही योगसाधना आहे हे हिराबाईंनी जाणले होते. त्यामुळे एक एक स्वर, एक एक राग आपलासा करण्यासाठी त्या कसून रियाज करत असत. हिराबाईंचा आवाज मुळात बारीक व किनरा होता. शास्त्रीय संगीतासाठी उपयोगी नव्हता, पण रियाजामधून त्यांनी आपला आवाज शास्त्रीय संगीतासाठी तयार केला म्हणून

त्यांच्या जीवनात रियाजाला, संगीत साधनेला अनन्य साधारण महत्व होते.

हिराबाईंच्या रियाजावर त्यांच्या आईची करडी नजर असे. त्या रियाजाला बसताच आई तांदळाचे पातेले घेऊन बसत असे. एक पलटा आरोही झाली की एक तांदळाचा दाणा फेकला जात असे. तोच पलटा अवरोही झाला की दुसरा तांदळाचा दाणा फेकला जात असे. पातेल्यमधील सर्व तांदूळ संपेपर्यंत ताराबाई, हिराबाईंकडून एक एक पलटा झोकून घेत असत.

प्रत्येक स्वरावर आवाज स्थिर ठेवण्यासाठी हिराबाईंना फार कष्ट घ्यावे लागले. त्यातून त्यांनी एक एक स्वर सिध्द करून घेतला. हिराबाईंचा प्रत्येक स्वर तंबोऱ्याच्या तारेमधून समरसून गेलाच पाहिजे असा ताराबाईंचा कटाक्ष असे. संगीतातील प्रत्येक स्वर सिध्द केला नाही तर परिणामकारक होणार नाही, कारण संगीतातूनच कलाकार श्रोत्यांशी हितगुज करत असतो. कलाकाराने आपल्या मनामधील, बंदिशीमधील भावना संगीताच्या माध्यमातून श्रोत्यांच्या पर्यंत पोहोचवून श्रोत्यांचे हृदय हेलावून टाकले पाहिजे आणि त्यासाठी समर्पक संगीत साधनाच झाली पाहिजे असा ताराबाईंचा आग्रह असे. त्यामुळे हिराबाईंनी आपल्या संगीत साधनेतून ती किमया साधली होती. 'सुराकडे लक्ष दे' हा वडीलांनी दिलेला कानमंत्र लक्षात ठेवून हिराबाईंनी संगीत साधना केली होती.

हिराबाईंनी रियाज कधीच चुकवला नाही. रात्रीची मैफिल कितीही उशिरा संपली तरी पहाटेची मंद्र साधना त्यांनी कधीच चुकवली नाही. रियाजातून हिराबाईंना स्वधर्म गवसला.त्यांनी आपल्या आवाजाची मर्यादा ओळखून त्या मर्यादेत त्या सहज गात असत. एक एक बंदिश तालाच्या प्रत्येक मात्रेत चपखलपणे बसवण्यासाठी ती बंदिश त्या असंख्यवेळा गात असत. संगीत साधनेतून हिराबाईंनी रंजकता आणि सुरेलपणा आपल्या गाण्यात साध्य केला. हिराबाईंचा सुरेलपणा म्हणजे त्यांनी कमावलेला एक दागिना होता. त्यांच्या षड्ज साधनेतून श्रोत्यांचे मन हेलावून जात असे. हिराबाईंनी तालाचे ज्ञान बबनराव खर्डीकराकडून आत्मसात केले. त्यांना तालाची थोडी भिती वाटत असल्याने त्या स्वतः ताल तबल्यावर वाजवयास शिकल्या आणि मनातून तालाची भिती पळवून लावली.

वरील विवेचनावरून संगीत साधनेचे अनन्य साधारण महत्व मोगूबाई आणि हिराबाईंच्या संगीत साधनेमधून दिसून येते. सिध्दी शिवाय प्रसिध्दी नाही हा उक्तीवाद दोघींच्या संगीत साधनेतून लक्षात येतो. कठोर परिश्रम केले तर फळ निश्चित मिळते हे दोघींनी आपल्या संगीत साधनेतून दाखवून दिले.

मोगूबाईच्या गायकीची वैषिश्ठये

मोगूबाई हया ख्यालगायिका होत्या. संगीताचा इतर कोणताच प्रकार त्यांनी आपल्या मैफलीत सादर केला नाही. आपल्या जयपूर घराण्याची चौकट कधी ओलांडली नाही.

त्यांच्या गायकीची वैशिष्ठये खालीलप्रमाणे आहेत.

1.कमीत कमी स्वराचा वापर करून जास्तीत जास्त समृध्द स्वरसंसार उभा करणे.

2.मोगूबाईच्या बंदिशीच्या मांडणी मध्ये स्वराचे उच्चारण, शब्दांची फेक कधी मात्रेच्या आधी तर कधी मात्रेच्या नंतर, पुर्वनियोजित वेगवेगळया कालबिंदूवर स्थापना, प्रत्येक स्वराचे, अक्षराचे व लयीचे विविध डोल या सर्वांच्या विविध गती, त्यातून निर्माण होणारे ताण आणि सरते शेवटी अखेरच्या समेवर समांरभकपूर्वक विसर्जन हे कसब खास करून दिसून येते.

3.मोकळा आवाज, आकारयुक्त आलापी आणि बंदिशीच्या अंगाने विस्तार.

4.त्यांची लयकारी आणि बोलतान. त्यांची गायकी लयीच्या अंगाने पोसलेली. बोलतानेत व तानेत देखील त्यांची लय सुटत नसे.

5.लडीवाळपणा व नाट्यमयता. त्यांचे बालपण नाट्यसंस्थांमधून गेले व त्या वयात त्यांनी नाटय संगीताचे शिक्षण देखील घेतले असल्यामुळे त्यांच्या गाण्यामध्ये विशेषतः बोल तानेमध्ये नाट्यमयता व लडिवाळपणा दिसून येतो. त्यांचे बोल फिरवण्याचे कसब पूर्णपणे हटके होते. शब्दाची मोड तोड नाही, ऱ्हस्व, दीर्घची उलथापालथ नाही, भलत्याच ठिकाणी शब्द तोडला जाणार नाही आणि स्वरव्यंजनातल्या स्वाभाविक नाट्यमयतेला धक्का लागणार नाही. त्यांच्या बोलतानेत भाषिक स्वर–व्यंजने आणि शब्द सांगितिक स्वरावर जेव्हा फुलासारखे तिरप्या लयीच्या डोलात तरंगत एक एक पुढे येत असत त्यावेळी त्याची शोभा प्रत्येकवेळी वेगळी असे आणि ही मोगूबाईंच्या बोलतानेची खासियत होती.

6.एका दमात अस्ताई पूर्ण करण्याची दैवजात ताकद मोगूबाईंमध्ये होती.

7.अत्यंत मनोहर लयकरी. मोगूबाईंना लयभास्कर खाप्रुमामा पर्वतकरांचा सहवास लाभल्यामुळे त्यांचे तालक्रियेतील नैपुण्य वाखाणण्यासारखे होते. अत्यंत लयकारीयुक्त पेचदार ताना हे खास कौशल्य.

8.टेन्शन आणि रेझोल्यूशनचे काटेकोर पालन मोगूबाईंच्या गाण्यात विशेष करून दिसून येते.

9.सहजगत्या गळयातून निघणारे दाणेदार तानपलटे,कठीण तान प्रकारची वेगवेगळी सुंदर उपज, तारपंचमा पर्यंत सहज जाण्याची ताकद त्यांच्या गाण्यात दिसून येते.

10.समेनंतर एकदा श्वास भरून घेतला की तानमध्ये न मोडता विलंबीत लयीत पुढच्या समपर्यंत श्वास पुरवून म्हणण्याची जीद्द व ताकद फक्त मोगूबाईंमध्येच दिसून येते.

11.शास्त्रीय संगीतातील इतर कुठलाही गीत प्रकार त्यांनी कधीच मैफलीत गायला नाही. केवळ ख्यालगायन हेच त्यांच्या मैफलीचे खास वैशिष्टय होते.

12.सारंगीच्या तार सप्तकातील षडजात सहज मिसळून जाणारा मोगूबाईंचा स्वर.

13.बैठकीमध्ये घराण्यातील खास अनवट राग म्हणजे बसंती केदार, रायसा कानडा, ललीता गौरी, सावनी केदार, बिहागडा इत्यादी.

14.झुमरा, विलंबित त्रीताल, आड चौताल, झपताल,रूपक तालांमध्ये बंदिशी सादर करणे.

15.आलाप संपवून समेवर येतांना समेच्या दोन मात्रा अलीकडे स्वरांचा सुरेख गुच्छ घेउन अचूक व चमत्कृतीपूर्ण मुखडा घेणे.

गुरू अल्लादिया खॉ आणि गुरू हैदर खॉ यांच्या गायकीचा अचूक संगम मोगूबाईच्या गायकीमध्ये पहावयास मिळतो.

हिराबाईंच्या गायकीची वैशिष्ठये

हिराबाई हया चतुरस्त्र गायिका होत्या.

1.किराणा घराण्यातील सर्व गुणांनी हिराबाईनी आपली गायकी अलंकृत केली होती.

2.अतिशय सुरेल आवाज, अत्यंत भावपूर्ण आलापी व स्वरभाव, स्वरप्रधान गायकी.

3.आलापीमध्ये बीनकारी अंगाची लकब आणि भरपूर कल्पानजन्य स्वरविलासाची आलापी.
4.अचूक स्वरफेक, स्वर, ताल, लय व शब्दावर विशेष ताबा.
5.आलापीत विविध करामती करणे.
6.तार षड्ज लावणे म्हणजे हिराबाईंच्या मर्मबंधातली ठेव होय. तार षड्ज लावण्याची खास खासियत.
7.स्वच्छ, दाणेदार, नागमोडी, गिरकी, फिरकीच्या ताना.
8.स्पष्ट व शुध्द शब्दोच्चार.
9.डौलाने विलंबीत ख्याल गायन करत असत तर द्रुतचीजा, तराणे दमदार लयीमध्ये गात असत.
10.ठुमरी गीतप्रकार अत्यंत रसपूर्ण व भावपूर्ण पध्दतीने गात असत.
11.आर्तता, श्रृगांर, करूणा इत्यादी भावनांचे दर्शन त्यांच्या ठुमरीत सहजपणे घडते.
12.त्यांच्या भजनामधून भक्तियोगाचे दर्शन घडते.
13.नाटयसंगीतामध्ये अभिनव गान कौशल्याचा व नाटकी ढंगाचा सहज सुंदर संगम.
14.अती सुरेलपणा हे हिराबाईंच्या गाण्याने खास वैशिष्टये आहे.
15.अतिशय मुलायम आवाज, ख्यालाची सुबग मांडणी.
16.आवाज मूळात किनरा पण त्या आवाजाला साधनेतून शास्त्रीय संगीतातील बैठकीचा आवाज तयार केला गेल्यामुळे त्या आवाजातून निघणारे स्वर काळजला भिडणारे.
17.तीनही सप्तकात फिरणारा आवाज, व्यासंगी आणि हुकमी गायकी.
18.ख्यालाचा अस्थाई, अंतरा व्यवस्थित म्हणून घेउन आलापीला सुरूवात करत असत. स्वरांचे गुच्छ करून आलापी करत.
19.रागीच बढत संथ पण धीरगंभीर, आलापीत मींडकाम व आस यास प्राबल्य.
20.ताना जड पण खुमासदार, गमकयुक्त, पिळदार, स्पष्ट, सुरेल, भरदार, दाणेदार व लांब पल्ल्याच्या.
21.ख्यालाची लय अती विलंबीत.
22.विलंबीत ख्यालानंतर त्याच रागातील जोड चीज आखीव रेखीव गात असत.
23.मैफलीत प्रामुख्याने प्रचलीत राग गात असत.
24.खास ढंगाने स्वरावली गाणे.

गुरू वहिदखॉ आणि गुरू सुरेश बाबु माने यांच्या तालमीमधून हिराबाईंनी आपल्या गायकीमध्ये किराणा घराण्याची सर्व वैशिष्ठये जोपासली. तर नाट्य संगीतात त्या बालगंधर्व, सवाई गंधर्व व गोविंदराव टेंभे हया दिग्गज गुरूंच्या मार्गदर्शनाखाली तयार झाल्या आणि ठुमरीच्या वाटचालीसाठी त्यांनी गोहरजान यांचे बोट धरले. वडिल अब्दुल करीम खॉ जरी गुरू म्हणून लाभले नसले तरी त्यांच्या सुमधूर श्रृतींरम्य गाण्याचे वळण हिराबाईंनी आत्मसात केले होते, हे त्यांच्या गाण्याच्या ध्वनिमुद्रिका ऐकल्यावर लक्षात येते.

सादरीकरणाची पध्दत

मोगूबाईंची राग सादरीकरणाची पध्दत एका रागाच्या उदाहरणावरून बघू. मोगूबाईंच्या आवाजात ती माझ्या आवडीचा केदार राग ऐकला आणि आपण सुरूवातीला शिकलेला आपल्याला सोपा वाटलेला 'केदार' राग तो हाच आहे का असा संभ्रम मला पडला. त्यांनी सुरूवातीला केदार रागातील एक राग वाचक समूह घेतला – सा सामप मप मप धमम म रेसासारेसमा म रेम मप मप मपध त्यानंतर विलंबीत त्रितालामधील ' पायो पायो मोहे राम नाम धन कबहू न लागे काई ' बंदिशीची अस्थाई पूर्ण म्हटली. बंदिशीचा मुखडा शुध्द मध्यमाचा कणस्वर घेउन पंचमावर घेतला. त्यानंतर एक आलाप घेउन अंतरा ' गुरू प्रसाद साधन की संगत, भागन बन आई' 'म्हटला' पायो पायो ' या अस्थाईचा मुखडा घेवून पधमप असा छोटा स्वरसमुह घेउन तिसऱ्या मात्रेपासून गुरूप्रसाद अंतरा सुरू केला. अंतऱ्यामध्ये

पधमप सां ऽ सां ऽ सां
गु ऽ रू ऽ प्र ऽ सा ऽ द

इथे लागलेला मुलायम तार षड्ज अंगावर शहारा आणतो. त्यानंतर आलापीला सुरूवात केली. मोगूबाईंची आलापी एकदम स्वच्छ, आकारयुक्त स्वराची, लयीला, लपेटून टाकणारी, आलापीमध्ये शब्दाचा वापर केलेला नाही. आलापी निकोप, निरामय, तालाला चिटकून लयीचे झोत सांभाळत अर्थपूर्ण.

1.म प म प म प ध पम म रे सासा सारे सा सा सा प
प म ध पम मपध म ध प म रे सासा रे सा सा म
मपध पायो पायो
2.सा म म मप मपमप धधप मप मप मप धप
प म नी ध प ध प म सा सा मम प मप धध प म
म प नी ध धम प मप मप मप ध पायो पायो

मुखडा अगदी चपखलपणे घेणे ही मोगूबाईंची खासीयत. तार सप्तकात मोगूबाईनी घेतलेली आलापी पूर्णपणे मोकळी, तरी आवाजात कुठेही कर्कशपणा जाणवला नाही. ते सौदर्यं त्यांनी आलापीत निश्चितपणे जपल्याचे दिसून येते. एका श्वासात पूर्ण आवर्तनाचा आलाप घेतल्याचे देखील दिसून आले. बोलआलाप ही तर मोगूबाईंची खासीयतच मुलायम पण स्पष्ट शब्दोचार, तालाच्या मात्रेवर आघात न करता धरून ठेवलेली सुक्ष्म लय, बंदिशीमधील शब्दांचे लयकारी युक्त, पूर्ण शब्द स्वरवाक्य बनवणे आणि वेधकपणे समेवर येणे ही वैशिष्ठये केदार राग ऐकतांना दिसून येतात. दोन्ही मध्यमाचा केलेला कौशल्यपूर्ण वापर, षड्जावरून घेतलेली शुध्दमध्यम व तीव्र माध्यमाची अचूक स्वर स्थाने, धैवतावरून शुध्द मध्यमावर येतांना

पंचमाला आणि तार षड्जावरून धैवतावर येतांना शुध्द निषादाला घातलेली सुक्ष्म साद, लयीशी खेळत तानांचे घेतलेले प्रकार, सारेच काही अभूतपूर्व ! अतिशय बुध्दीमत्तेने मांडलेला राग, समजायला कठीण असला तरी हृदयाला भिडणारा.

हिराबाईंचे गुरू उस्ताद वहिद खॉ यांनी हिराबाईंना पटदीप रागाने तालीम देण्यास सुरूवात केली. ज्या पटदीप रागाला हिराबाईंनी प्रतिष्ठा मिळवून दिली, त्या रागावरून हिराबाईंची राग सादरीकरणाची पध्दत बघू. भिमपलास रागामध्ये कोमल निषाद ऐवजी शुध्द निषादाचा उपयोग करून तयार झालेला हा पटदीप राग हिराबाईंनी त्यांच्या मुळातच गोड असलेल्या मुलायम, लवचिक आवाजाने अतिशय सुरेख प्रभाविपणे मांडला आहे.

रागाची सुरूवात गमपनीसां पनीसां हया राग वाचक स्वरसमूहाने करून त्रितालातील मध्यलयीत ' पीया नाही आये, घर से कबहूं' ही बंदिश अतिशय चटपटीतपणे गायलेली आहे. अस्थाईची उठावण चौदाव्या मात्रेपासून आहे. अंतऱ्याची उठावण सातव्या मात्रेपासून असून ' पिया नाही आ'म्हणून त्याला जोडून अंतरा ' जबसे गये मोहे सुदहून लिनी मन राहे जीया बहत हमारा' त्यांनी अस्थाई अंतऱ्यासह बंदिश पूर्णपणे म्हटली आहे. बंदिशीचा मूखडा निषादावर घेतलेला आहे.

पमगम प नी सां नी सां
पियाना ही आ ये

त्यानंतर किराणा घराण्याची स्वरवलये उलगडवत अतिशय समर्कपणे आलापी केली. मध्यलयीला साजेशी रागाची आलापी केली असून आलापीत कणस्वरांचा वापर करून बंदिश अतिशय सुरेख नटवली. आलापीची मांडणी सहज व वैशिष्ठयेपूर्ण केली आहे. सामगमप अशी पटदीप मधील मध्यमाची वेगळी जागा दाखवत गंधार, मध्यम, पंचमावरून शुध्द निषादा पर्यंत आलापांचे आकर्षक स्वरूप कलात्मक रूपात लावून त्या हळूवारपणे तार षड्जावर स्थिरावल्या आहेत पण लगेच अवरोही आलापाचे वळण स्विकारून पंचम, गंधाराशी हितगुज केले आहे

जसे सा म गमपनी ध प मगरेसा निसाग रे सा नि साम गमप मपनी ध प गमपनी मपनी
ध प गमपनी मपनी ध प गमपनी मपनी मपनी गमपनी ध प मपग सागमप गमपनी
ए पि या ना हि आ ये ए
पनीसा पनीसानी ध प पनीसानी धमपम धमपम गमपनी धपमप पीया नाही आये
पि या ना ही आ ये घ र

आलापात सुरूवातीला आकाराचा उपयोग करून नंतर बंदिशीतील शब्दाचा उपयोग करणे हे हिराबाईंचे खास वैशिष्ठय होते. हिराबाईंनी आलापात शुध्द निषादाचा उपयोग विस्ताराने केला आहे. हिराबाईंनी रागाच्या बंदिशीत व आलापामध्ये लावलेला तारषड्ज मनोवेधक, मन हरवून टाकणारा आहे. अर्थात हिराबाईंनी गायलेल्या कोणत्याही रागातील तार षड्ज आसंमत उजळून टाकणाराच आहे. हिराबाईंच्या पटदीप रागामधील स्वच्छ दाणेदार, जोशपूर्ण, गमकयुक्त ताना मन हेलावून टाकणाऱ्या आहेत. लयकारीशी, तालाशी कोणतीच झटापट न करता अती बुध्दीमत्तेचा कस न लावता, सामान्य श्रोत्यांच्या मनाला सहज भावणारे गाणे हिराबाईंचे आहे हे मात्र नक्कीच हिराबाईंचा शालीन स्वभाव त्यांच्या राग सादरीकरणातून दिसून येतो. हिराबाईंचे गाणे उंच पट्टीतील, पातळ आवाजाचे, अतिसुरेल असल्याचे त्यांच्या आलाप ताना ऐकल्यावर लक्षात येते. कोणत्याही वायफळ कसरती न करता त्यांच्या स्वभावाप्रमाणेच त्यांचे गाणे शांत सोज्वळ भासते हे नक्की.

निष्कर्ष

गुरू चांगले मिळाले, घराणेदार तालीम मिळाली, तरी त्या तालमीची नुसती नक्कल करून चालत नाही तर त्यासाठी स्वतःचा रियाज, स्वतःची बुध्दिमत्ता व स्वतःचा विचार असणे अत्यंत आवश्यक असते हे आपल्याला मोगूबाई व हिराबाईच्या गानशैलीचा अभ्यास करतांना दिसून येते. तसेच जीवनात येणा–या असंख्य अडचणीवर मात करून आपले ध्येय गाठले पाहिजे तरच आपण यशस्वी होऊ शकतो हे देखील या दोघींच्या शैलीचा अभ्यास करतांना लक्षात येते.

केसरबाई, मोगूबाईचे गाणे समकालीन प्रवासातील होते. दोंघीचे घराणे जयपूरचे होते पण केसरबाईंचे गाणे श्रीमंतासाठी होते तर मोगूबाईंचे गाणे आत्मकोशामधील होते. केसरबाईंनी लोकरूचीची जाण ठेवून ख्याला बरोबर ठुमरी गीत प्रकार तितक्याच समर्पक पणे गायला. मोगूबाईंनी मात्र घराण्याची वेस न ओलांडता स्वतःची स्वंतत्र शैली जोपासली.

हिराबाई आणि रोशनआरा बेगम या देखील किराणा घराण्यातील सहप्रवासी हिराबाईंच्या वडिलांकडे रोशनआरा बेगम शिकल्या. पण दोघींनी देखील किराणा शैलीला वेगळे वळण देउन स्वतःची स्वतंत्र शैली तयार केली. हिराबाईंनी लोकरूचीची जाण ठेवून, जाहिर जलसे करून, लोकांशी आपूलकीने वागून, स्वतःची गान शैली लोकाभिमूख केली. तर रोशनआरा बेगम यांनी घराण्याचा आधार घेउन स्वतःची सांगीतिक मूल्ये तयार करून स्वतंत्र विचाराने गाणे तयार केल्याचे दिसते.

मोगूबाई व हिराबाईंच्या शैलीचा अभ्यास करतांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, घराण्याची शिस्त जोपासून त्यात आपल्या स्वतंत्र विचारांची भर टाकून स्वतःची स्वतंत्र शैली दोघींनी तयार केली व संगीत क्षेत्रात राजमान्यता मिळविली.

संदर्भ –

1.डॉ. नारायण मंगरूळकर, संगीतातील घराणी आणि चरित्र, स्वरसंपदा प्रकाशन, नागपूर 1992 प्रथम आवृत्ती.
2.ए.पी. नारायणगांवकर, स्वरयोगिनी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई 2001, प्रथम आवृत्ती
3.वा.ह. देशपांडे, आलापिनी, मौज प्रकाशन, मुंबई 1979, प्रथम आवृत्ती.
4.पं.वि.ना. भातखंडे, क्रमिक पुस्तक मालिका भाग तीन, संगीत कार्यालय, हाथरस, 1982 प्रथम आवृत्ती
5.पं.वि.ना पटवर्धन, राग विज्ञान,भाग, तीन, अ.भा. गांधर्व महाविद्यालय,मिरज, 1991, प्रथम आवृत्ती
6.इंटरनेट.

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org